**Fortis**

Monthly Dossier –June 2017

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Navrashtra | Blood donation camp at Kalyan | 17.06.2017 | 02 |

## महिलांना उद्योजकांचे मार्गदर्शन

मुंबई : व्यावसायिक पातळीवर ब्रेक घेतल्यानंतर नव्याने करिअरची सुरुवात करू पाहणाऱ्या महिलांना एकत्र आणणाऱ्या जॉब्स फॉर हर या पोर्टलने करिअर ब्रेकवर असणाऱ्या महिलांना आपल्या करिअरला पुन्हा सुरुवात करण्याकरिता अनुभवी व्यावसायिक आणि विविध उद्योग जगतातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने जॉब्सफॉरहरद्वारे 'मेन्टफॉरहर' या दुसऱ्या रोड शोचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम मुंबईसह, गुडगाव, चेन्नई आणि बंगळुरूमध्ये जून महिन्यात आयोजित करण्यात येणार आहे. यात आयटी, एफएमसीजी, एज्युकेशन, ई-कॉमर्स आदी विविध क्षेत्रातील प्रमुख उद्योजकांचा सहभाग असणार आहे. मार्गदर्शक म्हणून ते महिलांना मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती मिळाली आहे.

## कल्याणमध्ये रक्तदान शिबिर



कल्याण : जागतिक रक्तदाता दिवसाचे औचित्य साधून कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या वतीने रक्तदान शिबीर आणि रक्तदानाचे महत्त्व याविषयी जनजागृती करण्यात आली. मनपाच्या या उपक्रमात फोर्टीस रुग्णालयाने सहभाग घेतला. या दिनाच्या महत्त्वविषयी बोलताना मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता रोडे म्हणाल्या, रक्ताचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रत्येक मुंबईकराने रक्तदानासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आम्ही आज मोठ्या प्रमाणात रक्ताचा साठा करण्याची आशा करतो, जो पुढील उपयोगासाठी रक्तपेढ्यांकडे पाठविण्यात येईल.

■ येथे आयोजित केलेल्या या शिबिराचा हेतू लोकांना शिक्षित करुन रक्तदान व त्याच्या महत्त्वाविषयी जागरुक करण्याचा असून या कार्यक्रमाला पाठिंबा देणाऱ्या दात्यांचे आभार मानण्याचा आहे. जे केडीएमसीचे कर्मचारी आपले रस्ते, नाले व गटार साफ करतात. पण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या आरोग्याच्या काळजीसाठी व त्यांचे आभार मानन्यासाठी हे शिबिर आयोजित केले होते. कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात केडीएमसी कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीसोबतच रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. ४० वर्षांवरील कर्मचाऱ्यांची रक्तदाब, रॅण्डम ब्लड शुगर व ईसीजी तपासणी करण्यात आली.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Sakal | Health checkup | 19.06.2017 | 03 |

# आरोग्य तपासणी

**कल्याण** : जागतिक रक्तदातादिनी कल्याण-डोंबिवली महापालिका व फोर्टिस हॉस्पिटल यांच्यातर्फे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात झालेल्या या शिबिरात पालिकेच्या कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. रक्तदाब, रँडम ब्लड शुगर व ईसीजी तपासणी करण्यात आली. त्यानंतर डॉक्टरांनी सल्लाही दिला. या वेळी रक्तदान शिबिरही झाले. अतिरिक्त आयुक्त संजय घरत, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता रोडे यांनी या शिबिराला भेट दिली. १५० हून अधिक कर्मचाऱ्यांनी यामध्ये सहभाग घेतला.



**कल्याण : शिबिरात पालिकेच्या कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.**

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Samana | Halth checkup for KDMC workers | 17.06.2017 | 07 |

## पालिका कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

***कल्याण :*** फोर्टिस हॉस्पिटलच्या वतीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबीर आयोजित केले होते. रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण येथे झालेल्या शिबिरात १५० कर्मचाऱ्यांची तपासणी करून त्यांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला. यावेळी प्रामुख्याने ४० वर्षांवरील कर्मचाऱ्यांची रक्तदाब, रॅण्डम ब्लड शूगर व ईसीजी तपासणी करण्यात आली. शिवाय रक्तदान शिबीरही घेण्यात आले. अतिरिक्त आयुक्त संजय घरत, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता रोडे, फोर्टिसचे डॉ. समीर कुलकर्णी आदी उपस्थित होते.



| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Prahar | Blood donation camp at KDMC for the health of workers | 17.06.017 | 02 |



# जागतिक रक्तदाता दिनी केडीएमसी कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

**जीवनदायी रक्तदान करण्याच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करण्याचा हेतू**

**कल्याण :** डोंबिवली महानगरपालिका (केडीएमसी) व फोर्टिस हॉस्पिटल, कल्याण यांनी जीवनदायी रक्तदान करण्याच्या अनुषंगाने रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण येथे केडीएमसी कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीसोबतच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ४० वर्षांवरील कर्मचाऱ्यांची रक्तदाब, रॅण्डम ब्लड शुगर व ईसीजी तपासणी करण्यात आली आणि त्यानंतर त्यांना डॉक्टरांचा सल्ला देण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त संजय घरत, उपायुक्त आणि डॉ. श्रीमती स्मिता रोडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या व्यापक आरोग्य शिबिरादरम्यान केडीएमसीच्या केडर ४ मधील १५० हून अधिक कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये हाऊस- किपिंग कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

या दिनाच्या महत्त्वाविषयी बोलताना, डॉ. श्रीमती स्मिता रोडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, कल्याण- डोंबिवली महानगर पालिका म्हणाल्या, ह्याप्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, या समजुतीसह प्रत्येक मुंबईकराने या थोर कार्याला पाठिंबा देत रक्तदानासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आम्ही आज मोठ्या प्रमाणात रक्ताचासाठा करण्याची आशा करतो, जो पुढील उपयोगासाठी रक्तपेढ्यांकडे पाठविण्यात येईल.

डॉ. समीर कुलकर्णी म्हणाले, रक्त हा मोठ्या जीवनदायी शस्त्रक्रियांमधील महत्त्वपूर्ण घटक आहे. सुसज्जित रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा करता येऊ शकतो आणि आवश्यकतेनुसार वैद्यकीय केंद्रांवर पाठविला जाऊ शकतो. आम्ही सामाजिक जबाबदार संघटन म्हणून अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन करणे सुरुच ठेवू, ज्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होण्यामध्ये मदत होईल. आमच्या डॉक्टरांनी सुद्धा या थोर कार्याला पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक रुग्ण व त्याच्या नातेवाइकांना सामावून घेण्याचे कार्य केले आहे.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Pudhari | Health checkup for KDMC employees | 17.06.2017 | 04 |



# पालिका कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका व फोर्टिस हॉस्पिटल यांच्यातर्फे बुधवारी पालिकेच्या रूक्मिणीबाई रूग्णालयात महापालिका कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीसोबतच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४० वर्षांवरील कर्मचाऱ्यांची रक्तदाब, रॅण्डम ब्लड शुगर व ईसीजी तपासणी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संजय घरत आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता रोडे उपस्थित होते. या व्यापक आरोग्य शिबिरादरम्यान केडीएमसीच्या केडर ४ मधील १५० हून अधिक कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली.